# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

## महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

### परिपत्रक

**विषय : विद्यार्थी सुरक्षा विमा, विद्यार्थी कल्याण निधी, विद्यार्थी आरोग्य सेवा योजना, आपत्कालिन निधी, विद्यापीठ क्रीडा मंडळ निधी, नोंदणी शुल्क, संगणक शुल्क व विकास निधीतील विद्यापीठ हिस्सा पाठविण्याबाबत**

शैक्षणिक वर्ष २०१६–१७ मधील आपल्या महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त संस्थेतील विविध अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्कातील विद्यापीठाचा हिस्सा ऑनलाईन पध्दतीने चलनाद्वारे दि. ३१ ऑक्टोबर २०१६ पूर्वी विद्यापीठास पाठविण्याबाबत परिपत्रक क्र. १७१/२०१६ दि. २९ सप्टेंबर २०१६ अन्वये सर्व संबंधितांना कळविण्यात आलेले आहे.

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, दिवाळी सणानिमित्त दि. २९ ऑक्टोबर २०१६ ते ०१ नोव्हेंबर २०१६ या कालावधीत विद्यापीठ कार्यालयास सुट्टी असल्याने दि. **१५ नोव्हेंबर २०१६** पर्यंत विविध अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्कातील विद्यापीठाचा हिस्सा ऑनलाईन पध्दतीने चलनाद्वारे पाठविण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे. पुढे असेही कळविण्यात येते की, अंतिम मुदतीपर्यंत चलनप्राप्त न झाल्यास अशा महाविद्यालयाबाबत विद्यापीठ अधिकार मंडळ जो निर्णय घेईल तो बंधनकारक राहील, कृपया याची नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे – ४११००७
संदर्भ : म.व.वि.वि.मं./२०१६–१७/२५८
दिनांक : २८/१०/२०१६

**संचालक,**
**महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ**

प्रति,

१. मा. प्राचार्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व महाविद्यालये.
२. मा. संचालक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असेलेल्या सर्व मान्यताप्राप्त संस्था.

प्रत :

मा. वित्त व लेखा अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे – ४११ ००७.